**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट,
नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६००३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहसंचालक, नगररचना विभाग,
कोल्हापूर महानगरपालिका, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९ / कोल्हापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि23-10-2006 |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट,
नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६००३

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
जि.कोल्हापूर श्री.कुणालकुमार

**जन माहिती अधिकारी** तथा सहसंचालक, नगररचना विभाग,
कोल्हापूर महानगरपालिका, जि. कोल्हापूर
श्री.विजयकुमार राम गोस्वामी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.४.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>(१)ई वॉर्ड सि.स.नं.२४८/अ/१/२७अ/५ महानगरपालिका नगररचना विभाग(लेआऊट) रेखांकन मंजुरीप्रमाणे महानगरपालिकेने कबजेपट्टी घेतली आहे का?<br>(२)कालावधी दि.१६.३.१९९४ ते २०.४.२००५.<br>(३)मे.दिवाण बिल्डर्स यांनी दि.१६.३.१९९९४ मध्ये जागा हस्तांतरित करणेबाबत उल्लेख केला आहे. सदर जागा महानगरपालिकेने कबजेपट्टी तयार करुन ताब्यात घेतली असल्यास त्याची प्रत. तसेच लेआऊटमधील रस्ते, ओपन स्पेस इ. ताब्यात केव्हा घेतले त्याची (कबजेपट्टी) प्रत. | |

## विवेचन

कोल्हापूर महानगरपालिकेने ई वॉर्ड सि.स.नं.२४८/अ/१/२७अ/५ ही जागा ताब्यात घेतल्याच्या कबजेपट्टीची प्रत, तसेच मंजूर रेखांकनामधील रस्ते, मोकळी जागा इ.ची प्रत अपीलकर्ता श्री.दिलीप अशोक देसाई यांनी जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक, नगररचना विभाग, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती न मिळाल्यामुळे श्री.देसाई यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. श्री.देसाई यांना तीन दिवसात माहिती पुरविण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिले. त्यानुसार देण्यात आलेली माहिती अपुरी व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन श्री.देसाई यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे दाद मागितली. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असून मागणी केलेल्या व्यतिरिक्त आणखी काही माहिती आवश्यक असल्यास व महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायद्यान्वये ती देणे आवश्यक असल्यास द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले. परंतु आपल्याला योग्य ती माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

उपलब्ध अभिलेखामधील सर्व माहिती श्री.देसाई यांना विनामूल्य देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक, नगररचना विभाग, कोल्हापूर महानगरपालिका श्री.विजयकुमार राम गोस्वामी यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. संबंधित जागा महापालिकेला हस्तांतरीत केलेली नाही व मंजूर आराखड्यामध्ये मोकळी जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेतल्याचे स्पष्ट केलेले नाही, म्हणजेच महानगरपालिकेकडे जागा हस्तांतरित झालेली नाही असा आपला समज झाला, असे श्री.देसाई यांनी नमूद केले. मात्र त्यांचा हा समज चुकीचा असून संबंधित नकाशासह त्याबाबतची वस्तुस्थिती श्री.देसाई यांना स्पष्ट करण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट केले. आपला गैरसमज झाल्यामुळे आपण अर्ज मागे घेण्यास तयार असल्याचे श्री.देसाई यांनी सांगितले.

सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता सर्व माहिती श्री.देसाई यांना देण्यात आलेली आहे, मात्र संबंधित मूळ जागा व त्यावरील बांधकाम यांचे नकाशे व कबजेपट्टीच्या संदर्भातील पत्राची प्रत आपल्याला मिळावी, अशी विनंती श्री.देसाई यांनी सुनावणीदरम्यान केली. तशी मागणी त्यांच्या मूळ अर्जात नसली तरी मूळ अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक ते निराकरण होण्याच्या दृष्टीने ती देणे उपयुक्त ठरेल. म्हणून एकत्रिकरणाच्या नकाशाची सत्यप्रत श्री.देसाई यांना त्वरित देण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता, त्यानुसार सदर नकाशाची सत्यप्रत दिल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार गोस्वामी यांनी दि.२५.७.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दि. ५.५.२००८

आपि
६+९६३

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्रं राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:१४+१७३/कोल्हापूर /२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.संपत पांडुरंग आबदार<br>'अवधूत' जयभवानी कॉलनी, रिंगरोड,<br>फुलेवाडी, कोल्हापूर ४१६०१० |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :सहाय्यक अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर, जि.कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | : अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>कोल्हापूर, जि.कोल्हापूर |

## विवेचन

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती दिली किंवा नाही याबाबत खुलासा केलेला नाही. नाबार्ड-३ कामाचे अंतिम देयक सादर केल्याशिवाय मुद्दा क्र.३ व ४ ची माहिती देता येणार नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी म्हटले आहे. मात्र ही अंतिम देयके कार्यकारी अभियंता यांनी एक महिन्यात पारित करावी, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांनी दि.६मे २००६ च्या निकालपत्रात म्हटले आहे. त्यानुसार कार्यवाही झालेली नाही. देयके पारित करणे प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे. परंतु या आदेशाला जवळजवळ दोन वर्षे होत असतानाही त्याबाबतची कार्यवाही झालेली नाही, व अंतिम देयक सादर केल्याशिवाय माहिती देता येणार नाही, असे जन

माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी म्हणतात, हे योग्य नाही. भ्रष्टाचार होत असल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. ते लक्षात घेता देयकांबाबतची ही परिस्थिती संशयाला वाव देणारी आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत असलेल्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेशी हे विसंगत आहे. मात्र भ्रष्टाचाराचे अपीलकर्त्याचे आक्षेप व त्या अनुषंगिक कार्यवाहीची मागणी हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अंतिम देयकासंबंधीच्या कार्यवाहीची व संबंधित कामातील भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीची माहिती हा आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी. या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि.६.५.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:९४ /कोल्हापूर /२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.संपत पांडुरंग आबदार<br>'अवधूत' जयभवानी कॉलनी, रिंगरोड,<br>फुलेवाडी, कोल्हापूर ४१६०१० |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>कोल्हापूर, जि.कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>कोल्हापूर, जि.कोल्हापूर |

अपीलकर्त्याला अपेक्षित असलेली माहिती यापूर्वीच देण्यात आली आहे. अपीलकर्त्याने आयोगाला सादर केलेल्या दि.१०.१०.२००७ च्या पत्रात कामाच्या प्रारंभ व पूर्ततेच्या तारखा आदींबाबत काही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याविषयी खुलासा सादर करण्याचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. अपीलकर्त्याची तक्रार भ्रष्टाचारविषयी असून त्या अनुषंगाने कारवाईची मागणी केलेली आहे. सदर मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याच्या दि.१०.१०.२००८ रोजीच्या राज्य माहिती आयुक्तांना पाठविलेल्या पत्राबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी हे आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात खुलासा आयोगास सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

**पुणे**
**दि. ५.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. सुभाष निवृत्ती शिलवंत,<br>मु.पो.शिरगांव, ता.कराड,जि.सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप निबंधक सहकारी संस्था, कराड, जि.सातारा |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सातारा, जि.सातारा |

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती दि.०३.०२.२००७ रोजी दिली असल्याचे अपिलीय प्राधिकाराचे म्हणणे आहे. शिरगांव विकास प्रशिक्षण संस्थेकडून घेऊन अपीलकर्त्यास हवी असलेली लिपीक पदाच्या कालावधीचा दाखला शिरगांव विकास संस्थेकडून घेऊन दि. २५.०५.२००८ पर्यंत अपिलकर्त्यास देण्याबाबतचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) वरील मान्यतेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिका-यांनी आयोगास दि.१०.०६.२००८ पर्यंत सादर करावा.

पुणे
दि.३१.०५.२००८

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता:

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुभाष खु. मालपाणी<br>९/८८, तेजस्वी, जयश्री सिझींगचे मागे,<br>सांगली रोड, इचलकरंजी, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग) पुणे विभाग, पुणे |

वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याला माहिती मिळाली असल्याने आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २६.५.२००८**

(स्टॅम्प: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.यशोदा दिनकर निपाणे
मुखत्यार विजय दिनकर निपाणे
मु.पो.निगुडमाळ, पो.नित्रळ, जि.सातारा
सध्या मुक्काम, ६८५ अ, मंगळवार पेठ, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, सातारा
पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कृष्णानगर, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, संगमनगर, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३ / सातारा / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, सातारा
पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कृष्णानगर, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, संगमनगर, सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.९.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, सातारा यांनी कार्यालयीन आदेश क्र.११८/२००४ नुसार निवृत्ती वेतन विषयक लाभाची थकबाकी दर्शविणारे परिगणना पत्र व निवृत्ती वेतन विषयक लाभाचे विहित नमुन्यातील परिगणना पत्रकाचा अहवाल. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आपले कार्यालयाकडून पाठविलेल्या अहवालाचा जावक क्रमांक व तारीख यांची माहिती व दाखला मिळणे. तसेच आदेशाबरोबरचे जोडपत्र क्र.१ ते४ याची माहिती. |
|---|---|

## विवेचन

सुधारित वाढीव सेवानिवृत्तीवेतनाच्या संदर्भात अपीलकर्त्या श्रीमती यशोदा दिनकर निपाणे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, सातारा यांच्याकडे माहिती मागितली होती. योग्य माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा यांच्याकडे अपील केले. विहित मुदतीत नसल्यामुळे त्यांनी अपील फेटाळले. त्याविरुध्द श्रीमती निपाणे यांनी ( त्यांच्या वतीने त्यांचे मुखत्यार) श्री.विजय दिनकर निपाणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सेवानिवृत्तीवेतन विषयक लाभांची मागणी हा अपिलातील मुख्य विषय आहे. या मागणीच्या अनुषंगाने परिगणना पत्रक, पत्रव्यवहाराच्या प्रती इ. माहिती श्रीमती निपाणे यांनी मागितली होती. ती आपल्याला दिली गेली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र ही माहिती नेण्याबाबत त्यांना मुदतीत कळविले होते. त्यांच्या प्रतिनिधीने ती नेली नाही, म्हणून नोंदणीकृत टपालाने ती पाठविण्यात आली. परंतु ते टपाल परत आले, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी पूरक कागदपत्रांसह आयोगापुढे नमूद केले. श्रीमती निपाणे यांनी अथवा त्यांचे मुखत्यार श्री.विजय निपाणे यांनी लेखी वा तोंडी निवेदन सादर केलेले नाही.

श्रीमती यशोदा निपाणे या श्री.विजय निपाणे यांच्या सावत्र आई आहेत. दोन पत्नींच्या वादाची पार्श्वभूमी या विषयाला असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले. मात्र आवश्यक ती सर्व माहिती दिली, तसेच दि.१२.९.२००६ पासून सेवानिवृत्ती वेतनही सुरु झाले, त्यामुळे मूळ प्रश्न

निकाली निघाला आहे अशी माहितीही जन माहिती अधिकारी श्री.दि.रा.मोरे व अपिलीय प्राधिकारी श्री.पं.छ.घोलप यांनी दिली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.८.५.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | ॲड. दीपक आप्पासाहेब उंडाळे<br>३३८/अ -४, ई वॉर्ड, रेल्वे स्टेशनसमोर,<br>स्टेशन रोड, कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी, करवीर विभाग, जि.कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस अधीक्षक, जि. कोल्हापूर |
| ५ | **मूळ अर्जात केलेली माहितीची मागणी**<br>अपीलकर्त्याने दुकानातील व त्याच्या घरातील मालाची चोरी झाल्याबद्दल पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्याकडे पाठविलेल्या तक्रारीच्या मूळ अर्जाची व झालेल्या जाबजबाबाच्या नकला व त्यावरील निर्णयाच्या नकलांची मागणी | |

अपीलकर्त्याने माहिती दि. १८.१.२००७ रोजी व आता दि. १३.५.२००८ रोजी मिळाली असल्याचे व मिळालेल्या माहितीने समाधान झाले असल्याचे वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेत नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** 31 **.५.२००८**

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री.सिताराम मारुती किर्तीकुडाव,<br>१५, जीवन सहकारी गृहनिर्माण संस्था,कर्मवीरनगर,<br>(कोडोली), सातारा,जि.सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा |

वरील तीनही घटकात झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याने मागितलेली दि.१२.०५.२००६ च्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिनियमाची प्रत प्राप्त झाली असल्याने समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्याने नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.०५.२००८

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**